**सरकारतर्फे साक्षदार क्रमांक १ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव – सावित्री केशवराव धुर्वे

वय – ४५ वर्ष, व्यवसाय – हातमजुरी

राहणार – शिवनगर कांद्री, ता.पारशिवनी, जि.नागपूर

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता विधीज्ञ ए.एम.भिवगडे यांच्यातर्फे**

१. मी आरोपींना ओळखते. ते माझ्या घराच्या शेजारी राहतात. दि.१६.१२.२०१९ मी सकाळी ०९.०० च्या दरम्यान भाजीपाला घेण्यासाठी गेली होती. मी दुकानाजवळ उभी होती. आरोपी रितेश व त्याची पत्नी हिने छीनाल रंडी को पैसे देकर आ असे म्हटले. तीन्ही आरोपींनी मला हाताबुक्कीने मारहाण केली. माझ्या उजव्या हाताच्या मधल्या बोटास इजा झाली होती. मी पोलीस स्टेशन येथे गेली होती. पोलीसांनी मला दवाखान्यात नेले होते. मी फिर्याद देऊन घरी गेली होती. आता मला माझी फिर्याद दाखविण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे त्यास **नि.क्र.३७** देण्यात येते. आता मला टंकलेखीत प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर असून त्यास **नि.क्र.३८** देण्यात येते. ज्या आरोपीने मला मारहाण केली होती ते आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**

**आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.भिमटे यांच्या मार्फत शपथेवर सुरू**

२. मी शिवनगर कांद्री येथे माझे कुटुंब ज्यामध्ये माझे सासु सासरे व चार मुलांसोबत गेल्या २४ वर्षापासून राहते सोबत माझी सुन देखील आहे. २००७ साली माझे पतीचे निधन झाले आहे. मी आधी सुतगिरणी येथे कामास होती आता सद्या मी नेहरु गेट येथील हॉटेलमध्ये गेल्या ४ वर्षापासून कामास आहे. आरोपींचे घर माझ्या घराच्या पाठी मागे आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपींना त्याच्या घरी जाण्यासाठी माझ्या घरासमोरुन जावे लागते. हे म्हणणे खरे नाही की माझे व आरोपीचे प्रस्तुतच्या खटल्याआधी किरकोळ गोष्टीवरुन भांडण व्हायचे. साक्षदार स्वतहून सांगते की आरोपी मला ताने द्यायचे.

३. हे म्हणणे खरे आहे की मी घटनेआधी आरोपींसोबत बोलायचे नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या पतीच्या निधनानंतर आरोपी रितेश प्रजापती यांच्याकडून हातउसने पैसे घेतले होते. हे

म्हणणे खरे नाही की उसने घेतलेले पैसे मी परत देत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की आरोपीची पत्नी माझ्या घरी येऊन पैसे परत मागीतले होते. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीच्या पत्नीला पैसे परत देत नाही छीनाल रंडी काय करायचे ते कर असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की मी माझे दीर व घरातील लोकांनी आरोपींना मारहाण केली त्या दरम्यान माझ्या बोटाला इजा झाली. हे म्हणणे खरे नाही की आरोपींना फसविण्यासाठी नि.क्र.३७ वरील खोटी फिर्याद दाखल केली. मी तीसरी चौथी पर्यंत शिकले आहे.

प्रश्न तुमही पोलीसात दिलेली फिर्याद वाचून पाहिली होती का?

उत्तर होय.

प्रश्न फिर्याद हिंदी मध्ये लिहीली होती किंवा मराठी मध्ये लिहीली होती?

उत्तर मी फिर्याद हिंदी मध्ये दिली होती व पोलीसांनी लिहून घेतली होती.

**४.** हे म्हणणे खरे नाही की आरोपी रितेशच्या पत्नीने कोणतीही शिवीगाळ केली नाही. हे म्हणणे खरे नाही की तीन्ही आरोपींनी मला मारपीट केली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपींच्याविरुद्ध खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

स्वा/-

ठिकाण –कामठी **(क्यु.आर. सय्यद)**

दिनांक –२०/०४/२०२६ प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी, न्या. क्र. ३, कामठी.